महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३१२ वा दिनांक : ११/१०/२०२५ वार : शनिवार

# मुख्यमंत्र्यांचा योगेश कदमांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नाशिकच्या दौऱ्यावर असून यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पुण्यातील कुख्यात गुंड घायवळ प्रकरणावर प्रश्न विचारण्यात आला असता फडणवीस यांनी बंदुकीचा परवाना दिला गेलेला नाही, असे म्हटले आहे. राज्याचे गृहराज्य मंत्री योगेश कदम यांनी बंदुकीचा परवाना नीलेश घायवळच्या भावाला दिला असल्याचा आरोप आहे. यावर फडणवीसांनी प्रतिक्रिया देत परवाना दिलाच नसल्याचे म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, गृहराज्य मंत्र्यांनी एक सुनावणी त्यावेळी घेतली होती. पण, हा परवाना दिलाच गेला नाही. पोलिस आयुक्तांनी त्या ठिकाणी वस्तुस्थिती लक्षात आणून दिली आणि त्यामुळे हा परवाना दिलेला नाही. परवाना दिला असता तर अशा प्रकारचा आरोप योग्य होता. पण, परवाना दिला गेलेला नाही, असे म्हणत फडणवीसांनी एकप्रकारे योगेश कदम यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत आहे.

सीपींना पूर्ण मोकळीक

सध्या नाशिकमध्ये सुद्धा गुन्हेगारीवर कारवाई केली जात आहे. यावर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी स्वतः सीपींना पूर्ण मोकळीक दिलेली आहे आणि अतिशय चांगल्या पद्धतीने या ठिकाणी काम चालू आहे. कोणी कोणत्याही पक्षाचा असो, भाजपचा असो, महायुतीचा असो किंवा अन्य कुठल्याही पक्षाचा असो कोणालाही सोडू नका, अशा प्रकारे त्यांना पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असे वाटते की ही जी काही गुन्हेगारी आहे, विशेषतः यामध्ये गुन्हेगारीमध्ये गुन्हेगारी करत असताना काही लोक त्याला जो राजाश्रय देण्याचा प्रयत्न करत असतात, वेगवेगळ्या पक्षात राजाश्रय देण्याचा प्रयत्न करत असतात तर अशा सगळ्या गोष्टींना मोडून काढायचा निर्णय आम्ही घेतला आहे. कोणाचा काहीही पास्ट असो, पण आता जर कोणी गुन्हेगारी करत असेल किंवा गुन्हेगारीकडे वळत असेल तर आम्ही त्याला सोडणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

## हर्षवर्धन सपकाळांकडून मुख्यमंत्र्यांची नथुराम गोडसेंशी तुलना

**मुंबई** : कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईतील गांधी भवन येथे पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी सरकारवर टीका करत असताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तुलना नथुराम गोडसे यांच्यासोबत केली होती. यावर आता भाजपकडून प्रत्युत्तर आले असून नवनाथ बन यांनी सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांचे वक्तव्य म्हणजे निर्लज्जपणा आणि नालायक पणाचा कळस, अशी टीका बन यांनी केली आहे.

नवनाथ बन म्हणाले, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवाभाऊंवर अतिशय खालच्या पातळीची टीका केली आहे. हा हर्षवर्धन सपकाळ यांच्या नालायक पणाचा आणि निर्लज्जपणाचा कळस आहे. एका बाजूला महात्मा गांधीचे नाव घ्यायचे आणि दुसऱ्या बाजूला अशा पद्धतीने नथुराम गोडसेंबरोबर तुलना करायची याबद्दल सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे.

पुढे बोलताना नवनाथ बन म्हणाले, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवा भाऊ हे गोडसे नाही तर महाराष्ट्रात गोडवा निर्माण करणारे नेतृत्व आहे. त्यामुळे जनतेने एकदा नाही, दोनदा नाही तर तीन वेळा देवा भाऊंना निवडून दिले आहे. हर्षवर्धनजी तुम्ही अशा पद्धतीचा नीचपणा करणार असाल तर जनता आणि भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तुम्हाला जशास तसं उत्तर देतील, असा इशारा नवनाथ बन यांनी दिला आहे. महात्मा गांधींचे नाव देखील घ्यायची तुमची लायकी नाही आणि तुम्ही नथुराम गोडसेंसोबत तुलना करत आहात, तुम्हाला लाज वाटली पाहिजे.

गांधी भवन येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या ओबीसी-मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य करताना देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, ओबीसी समाजाचे आरक्ष वाढवण्यात यावे अशी आमची मागणी आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाला आमचा विरोध नाही. असे असताना सुद्धा देवेंद्र फडणवीस जाणूनबुजून जातीपातीत, धर्मा-धर्मात भांडण लावत आहेत. हैदराबाद गॅझेटच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित करत आंदोलकांना दुसऱ्यांदा गुलाल उधळून वापस पाठवले. ते करत असताना त्यांनी टायमिंग जे साधले आहे ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे साधले आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, निवडणुका आल्या की महाराष्ट्रातले जातीय राजकारण हे खंगाळून, ढवळून द्यायचे आणि त्यात फोडा-तोडा आणि राज्य करा ही इंग्रज सरकारची जी भूमिका आहे त्या भूमिकेला भाजप हे सातत्याने कित्ता गिरवत असते. तेलंगणमध्ये जातीनिहाय जनगणना झाली आणि ओबीसींना ४२ टक्के आरक्षण देण्यात आले. हे संदर्भ जे आहेत हे महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस का लागू करत नाहीत? देवेंद्र फडणवीस हे भांडण लाऊन देतात आणि जसे नथुराम गोडसेंनी शांत डोक्याने महात्मा गांधीजींचा खून केला, तशाच शांत पद्धतीने देवेंद्र फडणवीस भांडण लाऊन बाजूला उभे राहतात.

# माझी इमेज डॅमेज करण्याचे प्रयत्न : गृहराज्यमंत्री योगेश कदम



**मुंबई** : पुण्यातील कुख्यात गुंडाच्या भावाला शस्त्र परवाना देण्याचा निर्णय घेतल्याप्रकरणी गृहराज्यमंत्री योगेश कदम अडचणीत आले आहेत. गुंड नीलेश घायवळच्या भावाला म्हणजे सचिन घायवळला शस्त्र परवाना मंजूर केल्यामुळे योगेश कदम सध्या चर्चेत आले आहेत. विशेष म्हणजे पुणे पोलिसांनी नकारघंटा वाजवल्यानंतरही कदम यांनी ही फाईल पुढे रेटली. त्यामुळे आता त्यांच्यावर विरोधकांनी विशेषतः ठाकरे गटाने टीकेची झोड उठली आहे. या प्रकरणी त्यांचे वडील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी त्यांची बाजू सावरून घेण्याचा प्रयत्न केला. आता योगेश कदम यांनी स्वतः एक्सवर एक पोस्ट शेअर करत आपले मत व्यक्त केले आहे.

योगेश कदम म्हणाले, २०१९ पासून माझी राजकीय कारकीर्द संपुष्टात आणण्याचा प्रयत्न काहीजण करत आले. तरीसुद्धा सच्च्या शिवसैनिकांच्या जोरावर मी निवडून आलो. सत्तेतला आमदार म्हणून जनतेच्या अपेक्षा माझ्याकडून वाढल्या, परंतु तेव्हादेखील ज्या विरोधकाला आम्ही पराभूत केले, त्यालाच ताकद देण्याचे काम काहीजणांनी केले. स्वतःच्या पक्षातील आमदाराला संपवण्याचा प्रयत्न काहीजण तेव्हापासूनच करत होते.

पुन्हा २०२४ च्या निवडणुकीत माझ्या कुटुंबियांचा स्वतःच्या वैयक्तिक राजकीय फायद्यासाठी वापर करून घेण्याइतपत राजकारणाची पातळी घसरली गेली. मला पराभूत करण्यासाठी त्यांनी समाज, पैसा आणि जातीच्या आधारावर गलिच्छ राजकारण करण्याचे अनेक प्रकार केले. माझी वैयक्तिक बदनामी करण्याच्या हेतूने माझ्या खाजगी आयुष्यातदेखील ढवळाढवळ करण्याचा काहीजणांनी प्रयत्न केला. तरीदेखील, दुसऱ्यांदा जनतेने माझ्यावर विश्वास ठेवून मला निवडून दिले. माझ्या वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर विश्वास दाखवत मला मंत्रीपद दिले. साहजिकच, ज्यांना मला आमदार म्हणून पाहण्याचीही इच्छा नव्हती, त्यांना मी मंत्री झालो हे कसे बघवणार!

गेल्या सहा वर्षांपासून लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना आजवर माझ्यावर कोणीही गुंड किंवा भ्रष्ट प्रवृत्तीचे समर्थन केल्याचे आरोप देखील करू शकले नाहीत. तरीसुद्धा काही ठराविक मंडळी माझी इमेज डॅमेज होण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करत आहेत. दुसऱ्याची प्रतिमा मलिन करण्याच्या नादात, राजकारणात सक्रिय नसलेल्या माझ्या आईलादेखील या राजकारणात ओढून नीचपणाचा कळस गाठला गेला. व्यक्तीबद्दल मनात असलेला द्वेष काहीजणांना राजकारणात इतक्या खालच्या पातळीवर घेऊन येईल, अशी कल्पनादेखील केली नव्हती.

असो, राजकारणात सर्वच गोष्टींचा 'सामना' करावा लागतोच. पण अशा राजकारणामुळे मी आजवर कधीच विचलित झालो नाही आणि पुढेही होणार नाही. मी माझे काम, माझी जबाबदारी आणि माझे कर्तव्य प्रामाणिकपणे निभावत आहे आणि पुढेही तसेच निभावत राहणार आहे. शेवटी असेच म्हणावे वाटते की, "छोटी मोठी वादळं उठली म्हणून पर्वत हलतो असे नाही", असे योगेश कदम यांनी ट्विट करत म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ ऑक्टोबर २०२५


## कालिकादेवी विद्यालयात श्री आबासाहेब सर्जेराव ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न




**शिरूर (कासार) :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.)ता. शिरूर (का.)जि.बीड येथे विज्ञान विषयाचे शिक्षक श्री आबासाहेब सर्जेराव ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा,मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब, नगरसेवक तथा माजी प्राचार्य व्ही.जी.काटे,माजी सभापती बबनदादा चौधरी,प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे,माजी प्राचार्य सुधाकर खोले,मा.शामराव हूले या मान्यवरांनी स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व. सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यानंतर सत्कारमूर्ती श्री आबासाहेब सर्जेराव ढवळे व सौ. नूतन आबासाहेब ढवळे यांचा सपत्नीक, कपड्यांचा आहेर,शाल,श्रीफळ,व पुष्पहार देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले की,श्री आबासाहेब ढवळे सर हे एक प्रामाणिक, विज्ञानवादी आणि एक नवोउपक्रमशील शिक्षक आहेत. त्यांनी एकूण 34 वर्षे, दोन महिने, शिक्षक म्हणून सेवा दिली आहे. त्यांनी अतिशय प्रामाणिकपणाने अध्यापनाचे कार्य पार पाडले.

विज्ञानासारखा ऋक्ष विषय कलेच्या माध्यमातून मुलांना सखोलपणे शिकविला.ते एक जातिवंत तथा हाडाचे शिक्षक असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे आवडते झाले होते. विशेष म्हणजे त्यांनी कालिकादेवी विद्यालयाला विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत राज्यस्तरीय पातळीवर नेले.त्यासाठी श्रीआबासाहेब ढवळे सरांचे मनापासून कौतुक; तसेच त्यांना सेवापूर्तीच्या आणि पुढील आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा देऊन मनःपूर्वक गौरव केला.यावेळी नगरसेवक वसंतराव काटे माजी प्राचार्य सुधाकर खोले प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे,ज्येष्ठ बंधू मा. सोपानराव ढवळे, अंबादास बडे ह.भ.प.बाबा महाराज बडे, प्रा. महारुद्र डोंगरे विद्यार्थी प्रतिनिधी चि.शोयब आतार इत्यादींनी मनोगते व्यक्त केली.

त्यानंतर सत्कारमूर्ती श्री आबासाहेब ढवळे सरांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितले की, माझ्या आयुष्यात शिक्षक अतिशय इमाण- इतबारे सेवा केली. एकूण 34 वर्षाच्या कार्यकाळातील अनेक आठवणींना उजाळा दिला.व आपल्या यशस्वी जीवनाचे रहस्य उलगडून दाखविले.

यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे, प्रा.नामदेव तरकसे प्रा.महारुद्र डोंगरे, विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आत्माराम झिजुर्डे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## इकरा पब्लिक शाळेच्या अबूजर जलाल ची विभागीय स्तरीय कॅरम स्पर्धेसाठी निवड





**जळगाव :** नुकतेच जिल्हास्तरीय शालेय कॅरम क्रीडा स्पर्धा कांताई सभागृह,जळगाव येथे संपन्न झाली या स्पर्धेत इकरा पब्लिक शाळेचा खेळाडू अबूजर जलाल याने घवघवीत यश संपादन करून विभागीयस्तरावर (नाशिक) झेप घेतली आहे.

अबूजर ने सलग आठ सामने खेळले व प्रत्येक सामन्यात विजय मिळवला या स्पर्धेत १४ वर्षाखालील विविध शाळांच्या मुला-मुलींनी सहभाग नोंदवला होता.१४ व १७ वर्षाआतील मुला मुलींच्या गटात तालुक्यातून सुमारे १६०हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत उत्तम खेळाचे प्रदर्शन करत इकरा पब्लिक स्कूलच्या अबूजर जलाल याने प्रथम स्थान प्राप्त केले.अबूजर आणि क्रीडा शिक्षक श्री आमीर सर यांचे संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह,सचिव एजाज मलिक, प्राचार्य शेख शकील व उप प्राचार्य मोहसीन खान यांनी अभिनंदन केले.शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.करीम सालार यांनी समाधान व्यक्त केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ ऑक्टोबर २०२५


## आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो (महिला आणि पुरुष) क्रीडा स्पर्धेत, सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या, खेळाडूंचे वर्चस्व



**छत्रपती संभाजीनगर** : दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो (महिला आणि पुरुष) क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

आंतर-महाविद्यालयीन तायक्वांदो क्रीडा स्पर्धेत महिला गटात एकूण १४ महाविद्यालयांतील ४४ खेळाडूंनी सहभाग घेतला होता, तर पुरुष गटात २४ महाविद्यालयांतील ४० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.आंतर-महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेचा निकाल - महिला गटU/46 * वजन गटात * १. मानसी मानकापे – आर.सी. कॉलेज, पाथरी , २. वैशाली नरवाडे – मिलिंद कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ३. ऋतुजा जाधव – पीईएस कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ४. चंचल बडवे – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

U/49 वजन गटात

१. मयुरी गावंडे – एम. एस. एस. कॉलेज, अंबड , २. रिद्धी सोमवंशी – एम. एस. एम. कॉलेज,छत्रपती संभाजीनगर ३. भाग्यश्री जाधव – संत तुकाराम कॉलेज, कन्नड . ४. अल्गुज देशमुख – एम.पी. लॉ कॉलेज , छत्रपती संभाजीनगरU/53 वजन गटात १. वेदिका अजमेर – एस. बी. ई. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय. छत्रपती संभाजीनगर २. वैष्णवी वारे – आय.बी.पी. महिला कॉलेज , छत्रपती संभाजीनगर ,३. संजीवनी नाजन – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ४. तेजल काकडे – देवगिरी कॉलेज , छत्रपती संभाजीनगरU/57 वजन गटात १. पायल घुगे – एम. आय. टी. कॉलेज, छत्रपती संभाजीनगर २. वैष्णवी पालसकर – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

३. वैष्णवी जिगे – परळी वैजनाथ कॉलेज ४. आयुतरंग टाकळे – आय. बी. पी. महिला कॉलेज ,छत्रपती संभाजीनगरU/62 वजन गटात १. समृद्धी सांगळे – आर.सी. कॉलेज, पाथरी २. अश्विनी वानखेडे – आय. बी. पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ३. ऋतुजा रानवळकर – देवगिरी कॉलेज छत्रपती संभाजीनगर

U/67 वजन गटात

१. महेशन युनुस – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर . २. मधुबाला लोहार – आय. बी. पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ३. तनुजा पालसकर – पी.जी. जिमखाना, छत्रपती संभाजीनगर U/73 वजन गटात - १. साक्षी बागडे – आय. बी. पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगर २. मेघा ताराटे – आय. बी. पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगर , ३. समीक्षा कांबळे – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर , ४. रोहिणी हातकांगणे – आय.बी.पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगरU/73 & त्यावरील (Above) वजन गटात १. मुक्ताई सुर्दसे – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर २. माया साळवी – आय. बी. पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगर , ३. फाल्गुनी गोरमे – आय. बी. पी. महिला कॉलेज, छत्रपती संभाजीनगर आंतर-महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेचा निकाल - पुरुष

गट U/54 वजन गटात

१. जयेश पाथरे – टोपे कॉलेज, जालना , २. अभिषेक ज्ञानेश्वर – आर.सी. कॉलेज, पाथरी , ३. प्रितम गोटेव – डी.डी. कॉलेज, वाळूज ४. सागर संतोष – केएसके कॉलेज, बीड U/58 वजन गटात १. सोमेश नंदगायळी – विद्याधन कॉलेज, छत्रपती संभाजीनगर २. साई दंडवते – एस.के. गांधी कॉलेज, कडा ३. राज कोल्हे – शासकीय अभियांत्रिकी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ४. शेख यासीन शेख – बालब भीम कॉलेज, बीड

U/63 वजन गटात

१. रितेश गायकवाड – राजकुंवर कॉलेज, जालना २. प्रतीक कांबळे – केएसके कॉलेज, बीड ३. विशाल शेंडगे – ॲडव्होकेट बी.डी. हंबर्डे कॉलेज, आष्टी U/68 वजन गटात १. देवेंद्र जोशी – केएसके कॉलेज, बीड २. मोहम्मद शहाबाज – आंबेडकर लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

३. शेख अस्लम – सर सय्यद कॉलेज, छत्रपती संभाजीनगर ४. खान वसीम सलीम – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

U/74 वजन गटात

* १. अमोल जराड – गांधी कॉलेज, जालना २. शाम दोईफोडे – देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

३. आदित्य चव्हाण – स्वामी विवेकानंद कॉलेज, मंठा ४. ऋतुराज सुरडकर – राजर्षी कॉलेज, पाथरी * U/80 वजन गटात १. सुदर्शन गायकवाड – बालब भीम कॉलेज, बीड २. पठाण तौवर खान – एमएसएस कॉलेज, जालना

U/87 वजन गटात

१. विष्णू चव्हाण – स्वामी विवेकानंद कॉलेज, मंठा U/87 & त्यावरील (Above) १. हत्वीक तांदळे – बी.पी.एड कॉलेज, बीड २. गिरीश बडगुजर – एमआयटी कॉलेज, छत्रपती संभाजीनगरदिवसभर चाललेल्या या क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ आंतरराष्ट्रीय जिमनॅस्ट मा. श्री.रोहन श्रीरामवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक व माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ.सचिन देशमुख, तसेच माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अपर्णा कोत्तापल्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.त्यांनी यावेळी सर्व खेळाडूंचे त्यांनी कौतुक करून अभिनंदन केले.

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ.सौ.इं.भा.पा.महिला महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या संचालक डॉ मनिषा वाघमारे,प्रा.अश्विनी शहाणे,श्री.उमेश शेटे तसेच कु.तेजस्वीनी साळवे,कु.आरती ठाकूर,कु.अमृता गायकवाड यांनी मेहनत घेतली.

## दोन् दुचाकी अपघातात दोन्ही जण जखमी



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दोन् दुचाकी अपघातात दोन्ही जण जखमीदि ०९ गुरुवारी सकाळी अकरा वाजता छत्रपती संभाजीनगर - खुलताबाद मार्गावरील दौलताबाद टी पॉईंट येथे दोन दुचाकिंची समोरासमोर धडक होऊन अपघात झालादीपक पंडित भारती, वय-37, चंद्रकला पंडित भारती, वय-52 राहणार म्हैसमाळ, ता.खुलताबाद,जिल्हा छत्रपती संभाजीनगर.हे दोघे दुचाकी डिलक्स क्र MH २० DZ २६१४ वर जात असताना एक अज्ञात दुचाकी समोरून येऊन धडक मारली यात दीपक यांचे पायाला मार लागून पाय फॅक्चर झाले तर चंद्रकला बाई यांना डोक्याला व गुढघ्या ला दुखापत झाली दौलताबाद पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर कोळी, राजेश पाटील, बंडू गोरे यांनी घटना स्थळी धाव घेत जखमीना नरेंद्र महाराज संस्थेच्या रुग्णवाहिकेने पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथे पाठवले अपघात होताच दुसरा पल्सर दुचाकी चालक घटनास्थळ वरून पळून गेला आहे पण अपघातात त्याच्या दुचाकी ची नंबर प्लेट सापळली आहे पुढील तपास दौलताबाद पोलीस हे करत आहे


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ ऑक्टोबर २०२५


## झेंडू

झाडावर खेळती
झेंडूची फुले
हवेच्या तालावर
हळूवार डुले

हिरव्या पानांत
बसती दडून
कधी वाटते
घ्यावी खुडून

दिवाळी दसऱ्याला
झेंडूचाच मान
दारावर तोरण
दिसते किती छान

सकाळी दिसती
पुजेच्या ताटात
महादेवाच्या पिंडीवर
बसती थाटात

घरादाराला सजवि
झेंडूच्या माळा
मनमोहक रंग
केशरी नि पिवळा

**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## पापण्यात पूर

उभ्या आयुष्याचा
हरवता सूर
पापण्यात पूर
दाटलेला

असं कसं देवा
संकटाचं देणं
वादळ भयान
सुटलेलं

आता कुठं रोप
कोवळं उगलं
पावसानं केलं
तोंड काळं

जीणं हे दुष्काळी
कधी अवकाळी
लिहिलंय भाळी
बळीराजा

लढण्या तू राजा
उभा वादळात
पाय शिवारात
रोवलेला

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**

## बांधावर पडेल का विकासाचा फुल?

कार दादा काल काय ऐकलं ते खरं आहे का
हजारो कोटींची घोषणा झाली म्हणे खर आहे का?

औंदा म्हण गरिबाला येतील चांगले दिस खरं आहे का
हजारो कोटी मध बांधावर पडलं विकासाचा फुल खर आहे का ?

शेतकऱ्यांच्या पिकाला मिळाला हमीभाव खरं आहे का
शेतकरी ही तुमच्यासारखा मर्सडीज मध्ये फिरल खरं आहे का

लडकी बहीण तुमची , सोन्यानं झाली पिवळी खरं आहे का
लाडका दाजी आता नसणार दुखी आता खरं आहे का

तुमच्या A.I ला म्हणे शेतीसाठी हजार पाचशे कोटी
कम्प्युटर आता साठेबाजार हिमालयात पाठवणारे खरं आहे का?

संग संग दादा कधी या घोषणा बांधावर येतील का
विकासाच्या पाईपाला पडलेली भ्रष्टाचारी छिद्र कधी बंद होतील का?

खरं सांग खरं सांग दादा आता तरी खरं होईल का
आज्या, पंज्या ने ऐकलेल्या घोषणा आता तरी खर्या होतील का?

उन्हाळ्यातील पाऊस नाही आमच्या काही कामाचा
तुझ्या घोषणांचा पाऊस नको आम्हाला फक्त दे पैसा घामाचा

सांग दादा सांग औंदा तरी खरं होईल का
हजारो कोटी च विकासाचा फुल बांधावर औंदा तरी पडलं का?

**संदिप संगीता नानासाहेब वाकडे**
रा. खेडा ता. कन्नड
छत्रपती संभाजी नगर


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## वंशाची पणती असते मुलगी

वंशाचा दिवा मुलगा,गोड समज आपली
वाती शिवाय दिवा,काय दिव्याची महती
जळत असते वात जेव्हा अंधार सरतो सारा
वंशाच्या दिव्यातली वात असते मुलगी
सासर आणि माहेराच्या
वंशाची पणती असते मुलगी...

वंश चालवण्याचा भार तोलत
हसत नाते जपत असते मुलगी
सुख दुःखाची सावली होऊन
समाज बंधणाच्या वनव्यात
पोळत असते मुलगी...

वाटणीच्या विरोधात जाऊन
नाते जोडण्याच्या बाजूने
खंबीर असते मुलगी
माय माऊलीची काया
घरची लक्ष्मी असते मुलगी
वंशाचा दिवा मुलगा तर
वंशाची पणती असते मुलगी...

**लक्ष्मण वाल्डे-कन्नड**
छत्रपती संभाजीनगर
मो.नं-८८८८६०६०६८

# जे. ई. एस. महाविद्यालय, जालना येथे जागतिक वन्यजीव सप्ताह साजरा



**जालना :** दिनांक 2 ते 8 ऑक्टोबर,2025 या दरम्यान जागतिक वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे वन्यजीवांचे संरक्षण, त्यांचे पर्यावरणातील योगदान आणि जैविक साखळीतील महत्त्व याबाबत जनजागृती निर्माण करणे हा होय.

शाश्वत विकासासाठी मानवाबरोबरच वन्यजीव आणि नैसर्गिक साधनसंपत्ती यांचे संतुलन राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. या संकल्पनेचा प्रसार विद्यार्थीदशेतूनच व्हावा, यासाठी प्राणीशास्त्र विभाग, जे. ई. एस. महाविद्यालय, जालना यांच्या वतीने जिल्हास्तरीय रांगोळी व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली.

ही स्पर्धा आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली होती.या स्पर्धेत जालन्यातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परीक्षक म्हणून डॉ. उमेश मोगले व प्रा. भाग्यश्री बियानी यांनी काम पाहिले. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांनी वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक: श्रीमती दानकुवर कन्या विद्यालयातील विद्यार्थिनी रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक: जे. ई. एस. महाविद्यालयाची विद्यार्थिनी जानवी तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिक: जनता हायस्कूलचा विद्यार्थी साई चौधरीपारितोषिक वितरण समारंभास मुख्य अतिथी प्रा. विक्रम देशमुख (भोकरदन) व उपक्रमशील शिक्षक श्री. संतोष गंडाळ उपस्थित होते.

तसेच विशेष उपस्थिती म्हणून डॉ. गणेश रोकडे उपस्थित होते.विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्रे देण्यात आली. या संपूर्ण स्पर्धेचे नियोजन श्रीमती मधुरा सातपुते आणि डॉ. गणेश फलके यांनी केले.प्रा. संतोष गंडाळ यांनी मनोगतात म्हटले की, "अशा प्रकारच्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देतात, आत्मविश्वास वाढवतात आणि पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करतात."

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी भूषविले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. फलके यांनी केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ ऑक्टोबर २०२५


## शिक्षण, संशोधन आणि मूल्यनिष्ठ सेवेचा अखंड प्रवास : डॉ. जी. के. कुलकर्णी



शिक्षण, संशोधन आणि मूल्यनिष्ठ सेवेचा अखंड प्रवासशिक्षण, संशोधन आणि मूल्यनिष्ठ सेवेचा अखंड प्रवास म्हणजेच डॉ. जी. के. कुलकर्णी सर. Zoology या विषयातील त्यांच्या सखोल ज्ञानामुळे, अध्यापनातील प्रगल्भता आणि संशोधनातील सातत्यामुळे ते विद्यापीठीन क्षेत्रात एक आदर्श म्हणून ओळखले जातात.

त्यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनप्रवास, कार्य आणि विचारसरणीचा मागोवा घेणे म्हणजेच एका ज्ञानदीपाला प्रणाम करणे होय. शैक्षणिक जडणघडण आणि अध्यापनातील समर्पणडॉ. कुलकर्णी यांचा जन्म संस्कारसंपन्न कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना निसर्ग, प्राणी आणि त्यांच्या जीवनशैलीबद्दल अपार कुतूहल होते. हेच कुतूहल पुढे Zoology विषयाकडे आकर्षित झाले.

त्यांनी Zoology मध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी पूर्ण करून संशोधन क्षेत्रात प्रवेश केला.अध्यापन क्षेत्रात पदार्पण करताना त्यांचा हेतू स्पष्ट होता "शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानाचा संचार नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा विकास करणे."त्यांच्या अध्यापनशैलीत प्रत्यक्ष निरीक्षण, प्रयोग आणि चर्चेला प्राधान्य असे. व्याख्यानांमध्ये शास्त्रीय पैलू, तात्त्विक आधार आणि प्रयोगात्मक अर्थ यांचे सुंदर मिश्रण आढळे. Zoology च्या गुंतागुंतीच्या संकल्पना ते अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगत.Zoology विषयातील त्यांच्या संशोधनाची दिशा विविध आणि समाजाभिमुख होती. त्यांनी Fish and Earthworm Biology, Ecology, Endocrinology, Toxicology, आणि Reproductive Physiology या उपशाखांमध्ये उल्लेखनीय संशोधन केले.प्रोफेसर म्हणून त्यांनी केवळ अध्यापनच नव्हे, तर विद्यापीठाच्या प्रगतीतही मोलाचे योगदान दिले.

विभागप्रमुख आणि विविध शैक्षणिक मंडळांचे सदस्य म्हणून त्यांनी अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. त्यांच्या कार्यकाळात Zoology विभागात संशोधन संस्कृतीला नवे आयाम मिळाले.त्यांच्या प्रशासकीय दृष्टीकोनात पारदर्शकता, शिस्त आणि समन्वय यांचा सुंदर संगम होता. त्यांनी सदैव "विद्यापीठ हे विचारांची प्रयोगशाळा असते" या भूमिकेवर ठाम राहून नवनवीन शैक्षणिक कल्पना राबवल्या.शैक्षणिक आणि संशोधन कार्यात यशस्वी असूनही डॉ. कुलकर्णी यांचा स्वभाव अत्यंत साधा आणि सौम्य आहे.

विद्यार्थ्यांविषयी आत्मीयता आणि सहकाऱ्यांशी स्नेहपूर्ण वर्तन यामुळे ते सर्वांच्या मनात आदराचे स्थान निर्माण करून गेले आहेत.त्यांची जीवनदृष्टी — "शिक्षक हा ज्ञानाचा वाहक असतो, पण त्याच वेळी मूल्यांचा संवाहकही असतो."डॉ. जी. के. कुलकर्णी यांनी Marine Biology आणि Marine Biodiversity या क्षेत्रात अत्यंत सखोल व मूळ स्वरूपाचे संशोधन केले. त्यांनी समुद्रातील जैवसंपत्तीचा अभ्यास करताना केवळ प्रजातींची विविधता मोजली नाही, तर त्या जीवांतील जैवसक्रिय (biologically active) संयुगांच्या रासायनिक आणि औषधी गुणधर्मांचा सखोल शोध घेतला.त्यांनी भारतीय किनारपट्टीवरील समुद्री परिसंस्थांचा सर्वांगीण अभ्यास केला. ॲनेलिड्स, क्रॅब्स, बर्नाकल्स तसेच लहान सागरी अपृष्ठवंशी प्राण्यांची जैवविविधता नोंदवली.

त्यांनी परिसंस्थेतील परस्परावलंबित्व, अन्नसाखळीतील समतोल आणि पर्यावरणीय बदलांचा सजीवांवर होणारा परिणाम वैज्ञानिक पद्धतीने उलगडून दाखवला.या संशोधनामुळे किनारपट्टीवरील परिसंस्थांच्या संवर्धनाचे आणि प्रदूषण नियंत्रणाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांच्या निरीक्षणांतून हे स्पष्ट झाले की, सागरी जैवविविधतेचा ऱ्हास केवळ सागरी जीवांवरच नव्हे, तर किनारी मानवी समाजावरही परिणाम करतो.त्यांनी polychaetes मधून मिळणाऱ्या जैवसक्रिय संयुगांचा antibacterial, antifungal, antiviral आणि anticancer गुणधर्मांच्या दृष्टीने सखोल अभ्यास केला.या संशोधनामुळे Marine Biotechnology क्षेत्रात भारतीय संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली.

त्यांच्या अनेक लेखांना प्रतिष्ठित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पत्रिकांमध्ये स्थान मिळाले आणि अनेक निष्कर्ष आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर झाले.डॉ. कुलकर्णी सर यांनी केवळ सागरी जीवांचा अभ्यास केला नाही, तर त्यांनी terrestrial—aquatic linkage या पर्यावरणीय घटकांचाही सखोल अभ्यास केला.विशेषतः त्यांनी earthworm आणि fish यांच्याशी संबंधित पर्यावरणीय संबंधांचा toxicity आणि mortality संदर्भात सुंदर अभ्यास केला.त्यांनी दाखवून दिले की विविध प्रदूषक रसायनांचा माती व जलातील सूक्ष्मजीव व प्राणीजीवनावर विपरीत परिणाम होतो. प्रदूषणामुळे जैवविविधतेत घट होते आणि परिसंस्थेतील संतुलन बिघडते.गांडूळांच्या जैवरासायनिक बदलांद्वारे मातीतील विषारी घटकांचा अंदाज लावता येतो, तसेच माशांच्या गिल्स, लिव्हर आणि गोनाड्सवरील बदल जलप्रदूषणाचे सूचक ठरतात. या अध्ययनातून त्यांनी पर्यावरणसंवर्धनासाठी शास्त्रीय उपाययोजना सुचविल्या. त्यांच्या मते "प्रकृतीचा अभ्यास म्हणजे तिच्या संतुलनाचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारणे."

त्यांच्या प्रयोगशाळेत संशोधन हे केवळ प्रयोग नव्हते, तर चिंतनशील आणि सामाजिक दृष्टिकोन विकसित करणारी प्रक्रिया होती. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना Marine Biology, Marine Biotechnology आणि Environmental Toxicology या क्षेत्रांमध्ये संशोधनासाठी प्रेरित केले.त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकांनी Ph.D. पदव्या संपादन केल्या.त्यांचा एक प्रसिद्ध विचार विद्यार्थ्यांमध्ये आजही प्रेरणादायी ठरतो > "समुद्रात शोध घेताना आपण केवळ प्रजाती नव्हे, तर जीवनाचे रहस्य शोधत असतो."त्यांच्या विद्यार्थ्यांनी पुढे जाऊन पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेच्या जतनासाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांमध्ये योगदान दिले.

डॉ. जी. के. कुलकर्णी सरांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक सतत पेटता राहणारा ज्ञानदीप.त्यांचे संशोधन, अध्यापनातील प्रामाणिकता आणि विद्यापीठीन योगदान हे शिक्षणक्षेत्रासाठी प्रेरणादायी आहेत.७५व्या वर्षात पदार्पण करताना आपण त्यांच्या दीर्घ कार्यकाळाला अभिवादन करतो आणि त्यांच्या ज्ञानदीपाचा प्रकाश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, हीच मन:पूर्वक शुभेच्छा.> "ज्ञान हे केवळ पुस्तकात नसते,ते त्या शिक्षकांच्या डोळ्यांत चमकते,जे आयुष्यभर शिकवत राहतात आणि स्वतःही शिकत राहतात."


**डॉ. विशाल वैद्य,**
प्राणीशास्त्र विभाग, गांधी कॉलेज, कडा


## मुप्टा बीड जिल्हा शिक्षक संघटनेची मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान महत्वपूर्ण बैठक, जिल्हा बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा : प्रा.शशिकांत जावळे



**बीड ( प्रतिनिधी)** : बीड जिल्ह्यातील सर्व 'मुप्टा' पदाधिकारी कार्यकर्ते यांना कळविण्यात येते की 'मुप्टा' शिक्षक संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीमध्ये मराठवाडा पदवीधर नोंदणी अभियान राबविण्यासाठी मुप्टाच्या वतीने जास्तीत जास्त पदवीधर नोंदणी करण्यासाठी 'मुप्टा' संघटनेच्यावतीने बीड शहरातील नीलकमल हॉटेल येथे ११ ऑक्टोबर २०२५ शनिवारी सायंकाळी ६.००वाजता महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.


बीड जिल्ह्या 'मुप्टा' शिक्षक संघटनेच्या वतीने पदवीधर नोंदणी मोठ्या संख्येने करण्यात येणार आहे. तसेच 'मुप्टा' शिक्षक संघटनेचा क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा व 'मुप्टा' संघटनात्मक बांधणी बाबत प्रामुख्याने चर्चा करण्यात येणार आहे.

या बैठकिचे आयोजन बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर यांनी केले आहे.वरील सर्व विषयावर मुप्टाचे संस्थापक सचिव प्रा.सुनीलजी मगरे सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

तरी बीड जिल्ह्यातील 'मुप्टा' पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन 'मुप्टा' बीड जिल्हा सचिव प्रा.शशिकांत जावळे, भैय्यासाहेब आदोडे, बाळासाहेब गव्हाणे, प्रा.नारायण घोलप , प्रवीण तरकसे, शैलेश चिलवंत, प्रा संजय बागुल, डॉ मनोहर सिरसाठ, प्राचार्य श्रीकांत वारभूवन, प्रमोद साळवे यांनी केले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ ऑक्टोबर २०२५

# हैद्राबाद गॅझेटीयर नाकारले तर १८ ऑक्टोबर रोजी मराठा याचिकावर सुनावणी कशासाठी ?




**मुंबई (प्रतिनिधी) :** सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी निर्गमित आदेशा विरुद्ध अनेक मान्यवर न्यायालयात जातील हे गृहीत धरून आम्ही सर्वोच्च न्यायालय विविध उच्च न्यायालयात कॅव्हेट पिटीशन दाखल केलेल्या असल्यामुळे मराठा आरक्षण विरोधकांच्या एक तर्फी मागणी वर एकतर्फी निर्णय घेता येणार नाही.वास्तविक पहाता सरकारने नवीन काही दिलं नाही सर्व काही जुनेच आहे त्यासाठी निर्णय अभ्यासपूर्वक वाचने गरजेचं आहे गॅजेट मध्ये नावे नसुन लोकांची संख्या नोंदी असलेली आकडेवारी आहे आणि आकडेवारी नुसार सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देता येत नाही.

माधुरी पाटील प्रकरणातील घटनापीठाच्या निर्णयास दुर्लक्षित करता येणार काय ? आणि पुढे जात पडताळणी वेळेस माधुरी पाटील या केस मधील सर्वोच्च न्यायालयात घटनापीठाने दिलेले निर्णय अंमलबजावणी केल्या शिवाय जात पडताळणी कशी करणार ? हे सुद्धा सर्वश्रुत असुन हे मराठा समाजासाठी काम करणाऱ्या लोकांना ज्ञात असणे गरजेचे आहे.. ओबीसी संघटनाने,कोणी रीट पिटीशन दाखल केली तरी सर्वोच्च न्यायालय दिल्ली नागपूर खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, मुंबई उच्च न्यायालयात आम्ही एकाच वेळी कॅव्हेट पिटीशन दाखल केली असल्या मुळे कोणीही कितीही संघटना कोर्टात जाऊ द्या त्यांचा बंदोबस्त अगोदरच आम्ही केलेला आहे.

हैद्राबाद गॅझेटीयर नाकारले असेल तर ? याचिकावर १८ऑक्टोबर २०२५ रोजी याच याचिकावर सुनावणी कशासाठी आहे ? अशी सर्व साधारण भावना असुन मुंबई येथील उच्च न्यायालयात दिवाणी अपील अधिकार क्षेत्र २०२५ चा लेखी याचिका क्रमांक १२२२८ वर्ष २०२५ चा लेखी याचिका २०२५ चा लेखी याचिका वर्ष २०२५ चा विविध लेखी याचिका क्रमांक असुन याचिका कर्त्या संघटना घटना, कुणबी सेना,महाराष्ट्र माळी समाज महासंघ,अहिर सुवर्णकर समाज संस्था, सदानंद बापू मंडलिक, महाराष्ट्र नाभीक महामंडळ विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर असे असुन यासह २०२५ च्या लेखी याचिकाचा अंतरिम अर्ज व लेखी याचिका, अंतरिम अर्ज विविध याचिका मध्ये अनेक मान्यवर वकील मंडळी ज्यात अनिल व्ही.अंतुरकर, वरिष्ठ वकील, सुदर्शन खवसे, रीट याचिका मध्ये याचिका कर्त्याचे वकील श्रीयश ललित याचिकाकर्त्याचे वकील वेंकटेश धोंड, वरिष्ठ वकील,रोहन केळकर, २०२५-ग्रुप मॅटर असे असुन हर्ष निशार व कु.नियती सोनटक्के वकील याचिका कर्ता अखिलेश दुबे, वर्गीस मिश्रा, अमित दुबे, उत्तम दुबे,वरद दुबे, अभिषेक कर्णिक,राजुराम कुलेरिया, शुभम शर्मा,इमाद खान, अॅलेक्स डिसोझा, साहिल उपाध्याय आणि शिवम मिश्रा मध्ये याचिका कर्त्या साठी वकील,कायदा समुपदेशकां द्वारे रीट याचिका माधवी अय्यपन आणि सत्यजीत यांच्या सोबत सतीश तळेकर आणि असोसिएट्स, याचिका कर्त्या साठी रीट याचिका स्टँप मध्ये महेश देशमुख (व्ही.सी. द्वारे) के.डी. पोटे यांच्या सोबत, विविध याचिका मध्ये रवी कदम, वरिष्ठ वकील,सूरज अय्यर, सुश्री कनक यांच्या सोबत नालिक, सुश्री गौरी जोशी त्यांचे गणेश अँड कंपनी,रीट याचिका/ आय ए एस टी मधील अर्जदार-मध्यस्थांचे वकील, राज्य शासनाचे वकील डॉ.बिरेंद्र बी.सराफ, महाधिवक्ता,सुश्री नेहा एस. भिडे यांच्या सोबत सरकारी वकील ओ.ए. चांदुरकर, अतिरिक्त सरकारी वकील,जय संकलेचा, सहाय्यक सरकार वादी आणि जी.आर. रघुवंशी, सहाय्यक सरकार प्रतिवादी-महाराष्ट्र राज्याचे वादी असे सर्व मान्यवर जण म्हणुन कोणत्या प्रकरणात सुनावणी साठी उपस्थित राहणार असुन जर हैदराबाद गॅझेटियर नाकारले असेल तर दिनांक १८ऑक्टोबर २०२५ रोजी कुठली सुनावणी आहे ?हा निकाल देते वेळी चंद्रशेखर, मुख्य न्यायाधीश आणि गौतम ए. अखंड असे होते.

दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी यावर निकाल आला असुन याला (हायब्रिड सुनावणी द्वारे ) यात सांगितले की, विविध रिट याचिका क्रमांक मध्ये काही किरकोळ सुधारणा करायच्या आहेत असे सांगून, याचिका कर्त्याचे वेंकटेश धोंड,माळी समाज महासंघ दिवसा दरम्यान अशा दुरुस्ती करण्याची परवानगी मागतो तर मसुदा दुरुस्तीची प्रत न्यायालयात सादर केली गेली असुन त्याच्या प्रती प्रतिवादी साठी उपस्थित असलेल्या सहाय्यक वकिलांना पुरवल्या गेल्या असुन मसुदा दुरुस्ती च्या अटींनुसार २०२५ च्या रिटयाचिका मध्ये सुधारणा करण्याची परवानगी देण्यात आली असुन याचिका कर्त्याला या रिट याचिकेत केलेल्या प्रार्थनांवर विचार करण्याचे स्वातंत्र्य असेल आणि आवश्यक असल्यास, त्यात सुधारणा करण्याचे स्वातंत्र्य असेल असे म्हटले असुन २०२५ च्या एका रिट याचिका मध्ये, परिच्छेद क्रमांक २,९ आणि २७ मध्ये सुधारणा करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

२०२५ च्या अंतरिम अर्ज म्हणून क्रमांकित अंतरिम अर्जाची प्रत न्यायालयात सादर केली असुन त्याची प्रत सहाय्यक वकिलाना तसेच अॅडव्होकेट जनरल यांना पुरवली गेली असुन, दुरुस्तीची मागणी करणारा अंतरिम अर्ज म्हणजेच २०२५ चा अंतरिम अर्ज ओळखण्या साठी "एक्स" म्हणून चिन्हांकित केला आहे आणि दुरुस्ती अनुसूची मध्ये रिट याचिकेत दुरुस्तीची मागणी असेल तोपर्यंत तो परवानगी आहे पुढे दुरुस्ती अनुसूची रिट याचिकेत योग्य ठिकाणी ठेवावी आणि ती पुढील तारखेच्या दिवसाच्या दरम्यान केली जाईल असे नमुद असुनया बाबी ७ ऑक्टोबर २०२५ रोजी २०२५ च्या अंतरिम अर्ज (स्टॅम्प) च्या रिट याचिका दोन रिट याचिका (स्टॅम्प) सोबत ७ ऑक्टोबर २०२५ च्या सुनावणी साठी ठेवावी असे सुद्धा न्यायमूर्ती गौतम ए.अखंड व मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर यांनी नमुद केले होते ते का केले असेल ? याचा विचार समाज बांधव करणार आहे की नाही ?कारण अद्याप हैदराबाद गॅझेटियर विषयावर अंतिम निर्णय घेण्यात आलेला नसुन त्यावर पुढील सुनावणी १८ऑक्टोबर २०२५ रोजी होणार आहे.मराठवाड्यातील नोंद उपलब्ध असलेल्या व्यक्तींनी विहित पद्धतीचा शासकीय अवलंब केल्यास कुणबी जात प्रमाणपत्र मिळणारच आहे.

ज्यांच्या कडे काही एक पुरावा नाही त्या सर्व " मराठा " बांधवांचे काय ? त्यानुसार सर्वपक्षीय सरकारने मराठा समाजाला एस.इ.बी.सी आरक्षण दिलं होतं आणि ते अजून टिकून आहे.नोंदी शोधण्याचे कार्य सुरू झाले आणि नोंदी शोधून,ज्यांच्या नोंदी सापडतील त्यांना जात प्रमाणपत्र देण्यास कोणी ही रोखू शकत नाही. परंतु " ज्यांच्या कडे काही एक पुरावा नाही त्या सर्व " मराठा " बांधवांचे काय ?" हा प्रश्न मात्र अनुत्तरित ठेवला जात आहे.

त्यामुळे प्रसिद्धी पासुन सातत्याने दुर असलेल्या संपूर्ण जीवन मराठा आरक्षण मिळवण्यासाठी बहाल केलेले समाज सेवक विविध न्यायालयात याचिका दाखल करून कायदेशीर सेवा प्रदान करीत असुन न्यायालयीन कामकाजावर त्या अर्जदाराचे सुद्धा बारकाईने लक्ष आहे. समस्त मराठा समाजास नम्र आवाहन असुन असेच लक्ष मराठा समाज बांधवांनी सुद्धा ठेवावे असे आवाहन राज्यभरा मधून रामचंद्र शेडगे सातारा मुंबई, संतोष दळवी मावळ पुणे, सुभाष देसाई कोल्हापूर, कृष्णात नलावडे माण सातारा,दत्ता शेळके,व्यासदेव पवार,प्रकाश भाऊ जगताप फलटण, श्रीपाद सपकाळ सातारा,गोपाळ चोपडे बुलढाणा, शिवाजी उगले जालना, नाना भिंताडे, पोपट भिलारे, संदीप ऐजरे, कृष्णाजी नलवडे,संतोष चव्हाण पुणे,कैलासराव पाटील मुंबई, आनंदराव भोसले कोल्हापूर, मधुकर कोडक मुंबई, अशोक शिंदे अहिल्यानगर, जितेंद्रभाई रांजने, जालिंदर वंडेकर,विजय वंडेकर, आळेफाटा, राजेश देशमुख नाशिक, चंद्रकांत शेळके, अनिल संकपाळ जगन्नाथ उदुगडे,वैभव बागल, सांगली,सौं.कविता शिंदे खटाव, अर्जुन पिसाळ सातारा, संभाजी जाधव नांदेड,प्रदीप कोरडे हवेली,प्रकाश तरटे आटपाडी सांगली,संतोष मोहिते कडेगाव सांगली,राज सस्ते आटपाडी सांगली,अक्षय घाडगे सांगली, प्रथमेश पवार सातारा हेमचंद्र नलवडे पुणे रुपेश मांजरेकर कोकण मुंबई. दिनेश धार पवार,कोकण मुंबई,दाजी बालुगडे,अंतूश पाटील सौ.हर्षदा कडू आदींनी केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ ऑक्टोबर २०२५

# भारतातील बाललैंगिक गुणोत्तर - १००० मुलांमागे फक्त ९२९ मुली

दरवर्षी ११ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट मुलींच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता यासारख्या मूलभूत सुविधांचा लाभ मिळवून देणे आणि समाजातील लिंगसमानतेची स्थिती सुधारण्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हे आहे. मात्र, या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारतातील मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील गंभीर असमानता चिंतेचा विषय ठरते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5, 2019–21) नुसार भारतात जन्मावेळी लिंग गुणोत्तर, म्हणजेच प्रत्येक १,००० मुलांमागे जन्मलेल्या मुलींची संख्या फक्त ९२९ इतकी आहे. ही संख्या नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तराच्या (९५२ मुली प्रति १,००० मुले) तुलनेत खूपच कमी आहे. ही विकृती फक्त आकडेवारीवर आधारित समस्या नाही, तर समाजातील मुलींबाबत असलेले मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेद स्पष्ट करते.नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तर साधारणतः ९५२ मुली प्रति १,००० मुले असते, हे नैसर्गिक प्रक्रिया आणि जैविक घटकांच्या परिणामस्वरूप तयार होते.

मात्र भारतातील मुलींच्या जन्मातील घट ही समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून गंभीर समस्या आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा लिंगभेद, सामाजिक अपेक्षा, मुलींबाबतच्या आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाशी निगडीत आहे. काही भागांत मुलींचे जीवन कमी महत्त्वाचे मानले जाते, मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि पोषण यामध्ये पुरुषांच्या तुलनेत कमी गुंतवणूक केली जाते, त्यामुळे मुलींचा दर्जा सामाजिकदृष्ट्या कमी होतो.भारतामध्ये मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येतील घटाचे कारण बहुप्रकारे आहे. सर्वप्रथम, लिंग निवडीच्या प्रथांचा विचार करता येतो. गर्भधारणेदरम्यान मुलींचे लिंग ठरवून, गर्भपात करून किंवा मुलींचा जन्म टाळण्याच्या प्रथांमुळे जन्मावेळी मुलींच्या संख्येत घट होते. लिंग निवडीच्या प्रथा, ज्या मुलींचा जन्म टाळण्यासाठी किंवा गर्भावस्थेत लिंग ठरवून गर्भपात करण्यासाठी केल्या जातात, या समस्येचे मूळ कारण आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भातील लिंग ठरवणे, मग ते अवैध असले तरी, काही भागांत अजूनही चालू आहे. या प्रथेमुळे फक्त मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येत घट होत नाही, तर समाजात मुलींबाबतचा दृष्टिकोन, त्यांच्या मूल्याची कल्पना आणि लिंगसमानतेची स्थितीही ढासळते. मुलींचा जन्म सामाजिक आव्हान मानला जातो, कधी आर्थिक भार म्हणून, तर कधी सामाजिक मर्यादा आणि सांस्कृतिक रूढींच्या आधारे कमी महत्त्वाचा मानला जातो.

ही प्रथा केवळ भारतापुरती मर्यादित नसून, काही अन्य आशियाई देशांमध्येही दिसून येते, मात्र भारतात तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव विशेष स्पष्ट आहे. मुलींच्या जन्मावर असलेला आर्थिक आणि सामाजिक दबाव देखील यामागे मुख्य कारण आहे. लग्नाचा खर्च, मुलींच्या शिक्षणाचा भार, आणि मुलींच्या भविष्याबाबत असलेली सुरक्षिततेची चिंता यामुळे अनेक कुटुंब मुलींच्या जन्माला प्राधान्य देत नाहीत. या मानसिकतेत बदल करणे आणि मुलींचे मूल्य उंचावणे हे समाजाच्या प्रत्येक घटकावर अवलंबून आहे.

भारत सरकारने या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना उपाययोजना राबविल्या आहेत. Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT) Act, 1994 ह्या कायद्याद्वारे गर्भावस्थेत लिंग निर्धारणावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील असमानतेवर नियंत्रण ठेवण्याचा एक महत्त्वाचा आधार आहे. तथापि, काही ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे नाही, ज्यामुळे लिंग निवडीच्या प्रथा काही प्रमाणात अजूनही चालू आहेत. त्यामुळे केवळ कायदे नाही तर समाजातील मानसिकतेत बदल आणणे गरजेचे आहे.

मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सुरक्षिततेची हमी देणे, त्यांच्या सामाजिक मूल्याची दखल घेणे आणि त्यांच्या विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. उदा. हरियाणा राज्यातील पंचकुला जिल्ह्यात २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर सुधारले असून ते ९५१ वर पोहोचले आहे, जे २०२४ मध्ये ९१४ होते. या सुधारणामागे PCPNDT कायद्याची कठोर अंमलबजावणी, MTP कायद्याची अंमलबजावणी, जिल्हा प्रशासनाची समन्वयित कार्यवाही आणि जनजागृती मोहिमांचा मोठा वाटा आहे. पंचकुला प्रशासनाने १३७ PNDT केंद्रांची, ४६ MTP केंद्रांची आणि १५ BAMS क्लिनिकांची तपासणी केली, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात सुधारणा साधली गेली. तथापि, गाझियाबाद (उत्तर प्रदेश) येथे २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर ८५३ वर खाली आले आहे, जे बेकायदेशीर गर्भपात केंद्रे आणि लिंग निवडीच्या प्रथांमुळे आहे. या ठिकाणी प्रशासनाने उपाययोजना राबवल्या असल्या तरी समस्या अजूनही गंभीर आहे.

यासोबतच सामाजिक उपाययोजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ योजना ही या दिशेने एक महत्वाचा उपक्रम आहे. या योजनेचा उद्देश मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि लिंगभेद कमी करणे आहे. या योजनेअंतर्गत मुलींच्या आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात. शाळा, सामाजिक संस्था आणि स्थानिक समुदाय यामार्फत मुलींच्या हक्कांबाबत जनजागृती केली जाते.

समाजात लिंगसमानतेबाबत मानसिकतेत बदल आणण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. मुलींच्या विकासासाठी पालक, शिक्षक, प्रशासन आणि समाजाने एकत्रित काम करणे अत्यावश्यक आहे.मुलींची जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही फक्त आकडेवारी किंवा सामाजिक प्रश्न नाही, तर त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावरही होतो. हा प्रश्न समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. लिंगभेदामुळे महिलांवरील हिंसा, लैंगिक छळ आणि समाजातील असमानतेची स्थिती अधिक वाढते. परिणामी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजाच्या संतुलनासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे, त्यांना समान संधी देणे, आणि लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच खरे उद्दिष्ट असावे.

मुलींचे योग्य स्वागत करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता याची हमी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही, तर मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि लिंगसमानतेसाठी जनजागृतीचा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि नैतिक समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.शेवटी, मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा समाजातील लिंगभेद आणि मुलींबाबतच्या मानसिकतेचा स्पष्ट सूचक आहे.

मुलींच्या सुरक्षिततेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक विकासासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही; तो मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य, आणि लिंगसमानतेसाठी मुलींच्या अधिकारांसाठी जनजागृतीचा दिन आहे. मुलींचे योग्य स्वागत करणे, मुलींचा जन्म स्वागतार्ह असावा, त्यांना शिक्षण, पोषण आणि सुरक्षितता मिळावी, आणि लिंगभेदाचा पूर्णपणे विरोध केला जावा ही समाजाची जबाबदारी आहे.

मुलींना शिक्षणाची आणि विकासाची संधी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच या दिवसाचे खऱ्या अर्थाने औचित्य आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)मो. क्र. ९९६०१०३५८२, ईमेल – bagate.rajendra5@gmail.com